| PUBLICATION | DATE | EDITION |
| --- | --- | --- |
| Kesari | September 13, 2011 | Pune |

# ट्रायकॉमच्या फ्रुट प्रॉडक्टस्‌ची विस्तार योजना

ट्रायकॉम फ्रुट प्रॉडक्टस् लिमिटेड फलोत्पादन प्रक्रियेमध्ये असलेली कंपनी असून, या कंपनीने एका वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर आता विस्ताराची योजना जाहीर केली आहे. कंपनीचा उत्पादन प्रकल्प पुण्याजवळ अन्दुरी गावात आहे.

फलोत्पादन प्रक्रियेची सुरुवात केल्यानंतरच्या या एका वर्षाच्या वाटचालीत ट्रायकॉम फ्रुटस्‌ने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वत:ची विश्वासार्ह प्रतिमा निर्माण केली आहे. नवीन फळे आणि भाज्यांचा अर्क यावर प्रक्रिया करून नवीन उत्पादने विकसित करण्यावर या कंपनीचा मुख्य भर असणार आहे.